महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २५९ वे | दिनांक : १५/०९/२०२६ | वार : मंगळवार

## नवले ब्रिजजवळ अभिनेत्रीवर हल्ला; गाडीत ओढण्याचा प्रयत्न



**पुणे :** पुण्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. 'लागिरं झालं जी' या लोकप्रिय मालिकेत 'मामी'ची भूमिका साकारणाऱ्या प्रसिद्ध अभिनेत्री कल्याणी नंदकिशोर यांच्यावर पुण्यातील नवले ब्रिज परिसरात काही गावगुंडांनी प्राणघातक हल्ला करून पैशांची मागणी केली तसेच त्यांना जबरदस्तीने गाडीत ओढून पळवून नेण्याचा प्रयत्न केला. अभिनेत्रीने सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करत हातावरील जखमा दाखवून हा धक्कादायक प्रकार उघडकीस आणला आहे. या घटनेनंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी गृहखात्यावर ताशेरे ओढत गुंडांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. अभिनेत्री कल्याणी नंदकिशोर या मुंबईहून साताऱ्याकडे जात असताना पुण्यात नवले ब्रिजखाली ही घटना घडली. चार अनोळखी गावगुंडांनी कल्याणी नंदकिशोर यांच्या कारसमोर स्वतःची गाडी आडवी घालून जाणीवपूर्वक धडक दिली. त्यानंतर त्यांनी पैशांची खंडणी उकळण्याचा प्रयत्न केला. पैसे उकळता आले नाहीत तेव्हा संतापलेल्या गुंडांनी कल्याणी यांचा हात जबरदस्तीने ओढून स्वतःच्या गाडीत बसवून पळवून नेण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत अभिनेत्रीच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे. कल्याणी यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये असाही आरोप केला आहे की, वाहतूक पोलिसांनी दबावाखाली येऊन त्या गुंडांना घटनास्थळावरून पळवून लावले. जर तिथेच पकडून त्यांची मेडिकल तपासणी केली असती, तर त्यांनी कोणती नशा केली होती किंवा ड्रिंक अँड ड्राईव्ह केले होते हे सिद्ध झाले असते.अभिनेत्रीने नऱ्हे पोलीस ठाण्यातील महिला अधिकारी वर्षा देशमुख आणि थिटे साहेब यांनी सहकार्य केल्याचे नमूद केले असून, या गावगुंडांविरोधात अधिकृत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, घटनेनंतर दोन दिवस उलटूनही आरोपी अद्याप मोकाट असल्याने पुणे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## गणेशोत्सवात आंदोलन टाळा; फडणवीसांचे जरांगेंना आवाहन

**मुंबई :** "मराठा आरक्षणाच्या संदर्भात राज्य सरकारने बहुतांश सर्व मागण्या पूर्ण केल्या आहेत. ज्या काही उर्वरित मागण्या आहेत, त्या सध्या न्यायालयाच्या विविध टप्प्यांवर असून संविधानाच्या चौकटीतच त्यावर निर्णय होऊ शकतो. अशा वेळी गणेशोत्सवाचे पर्व सुरू असताना मुंबईत आंदोलन करणे आणि गणेशभक्तांना असुविधा निर्माण करणे कोणासाठीही योग्य नाही. त्यामुळे या आंदोलनाचा निश्चितपणे पुनर्विचार व्हावा," असे स्पष्ट मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना आणि आरती केल्यानंतर फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन, गणेशोत्सवाचा संदेश, राज्यातील 'यूसीसी' (UCC) आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील भारताचे राजनैतिक यश यावर सविस्तर भाष्य केले.मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केलेल्या 'चलो मुंबई' आंदोलनावर आणि मागण्यांवर फडणवीस यांनी सरकारची स्पष्ट भूमिका मांडली. फडणवीस म्हणाले, "सरकारने सातत्याने प्रयत्न करून जवळजवळ सगळ्या मागण्या पूर्ण केल्या आहेत. उरलेल्या मागण्यांबाबत कोर्ट आणि संवैधानिक पद्धतींचा अवलंब करावाच लागेल. जे संविधानात्मक आणि कायद्याच्या चौकटीत बसणारे आहे, ते आम्ही करायला तयार आहोत. मात्र, जे नियम किंवा न्यायालयाच्या आदेशाबाहेर जाते, ते सरकारला करता येणार नाही.""आम्ही चर्चेचे दरवाजे कधीही बंद केलेले नाहीत. अतिशय खुल्या मनाने सर्व मागण्यांचा विचार झाला आहे," असे ते म्हणाले. सध्या राज्यभरात गणेशोत्सवाचा उत्साह आहे. "गणेशोत्सवादरम्यान मुंबईत आंदोलन करून भाविकांना आणि नागरिकांना वेठीस धरणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे या आंदोलनाचा पुन्हा विचार करावा," अशी विनंती त्यांनी जरांगे यांना केली. महाराष्ट्रात समान नागरी कायदा लागू करण्याच्या प्रश्नावर फडणवीस यांनी सांगितले की, "राज्यात 'यूसीसी'चा मसुदा तयार करण्यासाठी आधीच एक समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती आपले काम करत असून, लवकरच तिचा अहवाल सरकारला प्राप्त होईल. अहवाल आल्यानंतर आम्ही त्याची तातडीने अंमलबजावणी करू."देश-विदेशातील सर्व गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देताना ते म्हणाले, "विघ्नहर्त्याने आपला देश, राज्य, नागरिक आणि बळीराजासमोरील सर्व संकटे दूर करावीत, अशी चरणी प्रार्थना आहे. हा उत्सव साजरा करताना सर्वांनी जास्तीत जास्त पर्यावरणपूरक पद्धतीचा अवलंब करावा आणि प्रदूषण टाळून पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरा करावा."'ब्रिक्स' परिषदेवरून विरोधकांकडून उपस्थित केल्या जाणाऱ्या वादावर फडणवीस यांनी जोरदार प्रहार केला.

## जरांगे म्हणाले: मुंबईत एकटा येतोय; परवानगी देणार का?



**जालना :** मनोज जरांगे पाटील यांनी १५ सप्टेंबरला अंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने रवाना होण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सकाळी ११ वाजता मुंबईकडे निघणार असल्याचे स्पष्ट केले. मात्र, यावेळी मोठ्या संख्येने मराठा बांधवांना सोबत न घेता आपण सुरुवातीला एकट्याने किंवा अत्यंत मोजक्या लोकांसह मुंबईकडे जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. मुंबई पोलिसांनी त्यांच्या प्रस्तावित आंदोलनाला परवानगी नाकारली असतानाही १५ सप्टेंबरचा प्रवास नियोजित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. जरांगे म्हणाले की, त्यांच्या ताफ्यात सुरुवातीला जास्तीत जास्त दोन गाड्या असतील. एखादी गाडी बंद पडल्यास दुसऱ्या गाडीतून प्रवास करता यावा, अशी व्यवस्था केली जाईल. त्यासोबत दोन रुग्णवाहिका ठेवण्यात येणार असून, एकूण चार वाहनांपेक्षा अधिक ताफा नसेल, असे त्यांनी सांगितले. आपल्यासोबत पाच ते दहा जणांपेक्षा अधिक लोक नसतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. मराठा समाजाने मोठ्या संख्येने मुंबईकडे जाण्यासाठी केलेली तयारी थांबवू नये, असे आवाहन करतानाच ती ताकद योग्यवेळी वापरण्याची गरज असल्याचे जरांगे यांनी सांगितले. गावागावातून जमा केलेल्या वर्गण्या आणि मुंबईकडे जाण्यासाठी तयार केलेल्या गाड्या जशाच्या तशा ठेवाव्यात, त्यातील पैसा सध्या खर्च करू नये, अशी सूचना त्यांनी केली. योग्य वेळी मराठा समाजाला मुंबईत बोलावले जाईल, असेही त्यांनी म्हटले. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाला मुंबई पोलिसांनी पुन्हा एकदा परवानगी नाकारली आहे. आझाद मैदानावर आंदोलनासाठी यापूर्वी परवानगी नाकारल्यानंतर जरांगे यांच्या वतीने नव्याने परवानगीचा अर्ज करण्यात आला होता. मात्र, या अर्जावरही पोलिसांनी नकार दिला आहे. दुसऱ्यांदा परवानगी नाकारल्याने आता मनोज जरांगे काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे. 'मी एकटा खिंड लढतो' अशी भूमिका जरांगेंनी मांडली. मुंबईकडे जाताना रस्त्यात येणारे अडथळे आणि अडचणी आपण आधी पार करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. 'रस्त्यातले काटे मला काढू द्या, म्हणजे मराठ्यांना ते टोचणार नाहीत', अशा शब्दांत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे सुरुवातीला मोठा जमाव मुंबईकडे न पाठवता परिस्थितीचा अंदाज घेण्याची रणनीती त्यांनी मांडली आहे. मुंबईतील आझाद मैदानावरील आंदोलनाला परवानगी नाकारण्यात आल्यानंतर जरांगेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट सवाल उपस्थित केला. 'मराठे येणार म्हणून परवानगी नाकारली, आता मी एकटाच येतोय; मला तरी आझाद मैदानाची परवानगी देणार का?' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पोलिसांनी सुरक्षा, वाहतूक, सार्वजनिक अडथळे आणि गणेशोत्सवाच्या काळातील बंदोबस्ताचा ताण यांसह विविध कारणे देत आंदोलनाला परवानगी नाकारली आहे. पत्रकार परिषदेत जरांगेंनी सरकारवर गंभीर आरोप केले. गणेशोत्सव आणि सणांच्या पार्श्वभूमीचा वापर करून मराठा आंदोलनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच आंदोलनात गैरप्रकार घडवून त्याचा ठपका मराठा समाजावर ठेवला जाऊ शकतो, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. मात्र, हे आरोप जरांगेंनी केले असून त्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. १२ सप्टेंबर रोजी अंतरवाली सराटी येथे मोठ्या संख्येने मराठा समाज एकत्र आला आणि आपली एकजूट दाखवून दिली, असा दावा जरांगेंनी केला. त्यामुळे आता पुन्हा एकदा लाखोंच्या संख्येने एकाच वेळी मुंबईकडे जाण्याची गरज नसल्याचे त्यांनी सांगितले. आंदोलनासाठी लागणारी ताकद योग्य वेळी वापरली जाईल, अशी भूमिका त्यांनी मांडली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १५ सप्टेंबर २०२६


## दहिगावात प्रमुख चौकातील सेतू सुविधा केंद्रातून पन्नास हजारांची चोरी





**यावल (प्रतिनिधी) :** यावल तालुक्यातील दहिगाव येथील प्रमुख चौकात असलेल्या सेतु सुविधा केंद्रामधून पन्नास हजार रुपयाची रोकड अज्ञात चोरट्यांनी दि.१३ व १४ चे रात्री लंपास केल्याची घटना घडली. याबाबत यावल पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दहिगाव येथील श्री विठ्ठल रुक्माई मंदिरासमोरील ग्रामपंचायतीच्या मालकीच्या व्यापार संकुलनामधील स्वराज्य सेतु सुविधा केंद्रातून रात्री अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे शटरचे कडी कोंडे कापून आत प्रवेश करीत ५० हजार रुपयाची रोकड लंपास केली असल्याची फिर्याद सुविधा केंद्राचे संचालक सुदर्शन अभिमन्यू पाटील यांनी यावल पोलिसात दिले वरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या पंधरा दिवसात प्रमुख चौकातील व्यावसायिकांमध्ये दहशत निर्माण झालेली आहे एका पान टपरी मधून ६६ हजार रुपयांची रोकड पान टपरीच्या दरवाजाचे कळी कोंडे कापून लंपास केली होती.त्याचप्रमाणे आणखी दोन व्यवसायिकांचे दुकाने फोडण्याचा प्रकार घडला होता. तर गावातही वाढीव वस्ती मधून काही वस्तू लंपास झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. या प्रकारामुळे व्यवसायिकांमध्ये मात्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.दहिगाव दूर क्षेत्र आहे. मात्र तेथे स्थानिक पोलीस प्रशासन नाही त्यामुळे असे प्रकार घडतात असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या गंभीर प्रश्नाकडे पोलीस प्रशासनाने लक्ष घालावे अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत. पुढील तपास पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांचे मार्गदर्शनाखाली दहिगाव क्षेत्राचे पोलीस कर्मचारी करीत आहेत

## मुरूमच्या 'मानाचा आजोबा किसन गणेश मंडळा'चा गणेशोत्सव सामाजिक उपक्रमाने सुरू; प्रतिष्ठापनेपूर्वी भव्य रक्तदान शिबिर



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** शहरातील ७७ वर्षांची परंपरा असलेल्या आणि धाराशिव जिल्ह्याचा 'मानाचा आजोबा गणपती' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या किसन गणेश मंडळाच्या वतीने गणेशोत्सव २०२६ चा प्रारंभ सामाजिक उपक्रमाने करण्यात आला. गणेश प्रतिष्ठापनेच्या पहिल्याच दिवशी मंडळाने रक्तदान शिबिराचे आयोजन करत समाजसेवेचा आदर्श संदेश दिला आहे. सोमवार (ता. १४) रोजी सकाळपासून आयोजित या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.उत्सव केवळ मनोरंजन न राहता समाजसेवेची प्रेरणा ठरावा, या उद्देशाने मंडळ दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवते. यंदाही ही परंपरा कायम राखत पहिल्याच दिवशी रक्तदानासारखा उपक्रम राबवल्याबद्दल मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे. सायंकाळी ७ वाजता श्री गणेशाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली.रक्तदान शिबिराचे उद्घाटन नगरसेवक सूर्यकांत जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अरविंद फुगटे, अनिल भुसाळे, ईश्वरचंद्र अंबर आणि रवींद्र जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात रक्तदात्यांना गणेश मूर्ती भेट देण्यात आली. विशेष म्हणजे, युवती व महिलांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून 'महिलांच्या रक्तदानामुळे शरीराला नवीन ऊर्जा मिळते' हा संदेश दिला.शिबिराचे यशस्वी आयोजन किसन गणेश मंडळाचे अध्यक्ष राहुल सत्रे, उपाध्यक्ष स्वप्निल जाधव, सचिव पवन फुगटे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, गणेशभक्तांच्या सहकार्याने झाले. उमरगा येथील श्रीकृष्ण रक्तपेढीचे विजय केवडकर, ऋतिक म्हेत्रे, स्वप्निल देशमुख, राहुल कांबळे यांनी रक्तसंकलनाचे व्यवस्थापन पाहिले. गणेशोत्सवाच्या कालावधीत मंडळाच्या वतीने यापुढेही विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे अध्यक्षांनी सांगितले.

## अमित शाहांचा एशियाटिकच्या डिजिटायझेशनवर भर



**मुंबई :** भारतीय ज्ञानपरंपरेचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्यासाठी एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईने पुढाकार घ्यावा. संस्थेकडील ज्ञानसंग्रहाचे डिजिटायझेशन करून तो देशभरातील विद्यार्थी, संशोधक आणि अभ्यासकांना उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. टाउन हॉल येथे एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईच्या नवनिर्वाचित समितीच्या परिचय कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, आमदार अमित साटम, प्रवीण दरेकर, एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, सचिव विवेक गणपुले आदी उपस्थित होते. यावेळी सुप्रसिद्ध उद्योजक रमेश दंडवते यांनी एशियाटिकच्या बळकटीकरणासाठी 50 लाख रुपयांची मदत केली, याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, राष्ट्राची स्मृती, इतिहास, संस्कार, भाषा, अभिलेख आणि परंपरांचे जतन महत्त्वाचे आहे. इतिहास आणि सांस्कृतिक परंपरांचे संरक्षण करणाऱ्या राष्ट्राची अस्मिता कधीही नष्ट होत नाही. भारतीय ज्ञानपरंपरा अनेक आव्हानांनंतरही टिकून राहिली आहे. ज्ञान कोणत्याही चौकटीत बंदिस्त न राहता मुक्त असले पाहिजे. या ज्ञानाचा उपयोग देशासह संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी व्हावा. भारतीय इतिहास, पुरातत्त्व, भाषा, तत्त्वज्ञान, साहित्य आणि विज्ञानाचे पुनर्मूल्यांकन भारतीय दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. सोसायटीने महाराष्ट्रातील विद्यार्थी व संशोधकांना संग्रहाच्या अभ्यासासाठी प्रोत्साहन द्यावे, ज्ञानसंग्रहाचे डिजिटायझेशन करावे आणि देशातील ग्रंथालये व संशोधन संस्थांना सामायिक व्यासपीठावर जोडावे. तसेच 'ज्ञान भारत राष्ट्रीय पांडुलिपी मिशन'मध्ये सक्रिय सहभाग घेऊन गावागावांत आणि विद्वानांच्या घरांमध्ये जतन केलेल्या दुर्मीळ पांडुलिपींचा शोध, संकलन, संवर्धन व संशोधनासाठी विशेष अभियान राबवावे, असे आवाहनही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एशियाटिक सोसायटीच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी राज्य शासनाचे पूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही दिली. इतिहास हा केवळ भूतकाळ समजून घेण्याचे साधन नसून वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्याचा वेग निश्चित करणारा महत्त्वपूर्ण दुवा आहे, असे त्यांनी सांगितले. मानवतेचा प्रवास, विचारांची जडणघडण, अभ्यासपद्धती आणि विविध शास्त्रांची उत्क्रांती यांचे दस्तऐवजीकरण होणे अत्यावश्यक आहे. परकीय आक्रमणांमध्ये नालंदा विद्यापीठाच्या मोठ्या प्रमाणावर नष्ट झालेल्या ग्रंथसंपदेच्या घटनांतून ज्ञानसंपदेच्या जतनाचे महत्त्व अधोरेखित होते. मात्र अनेक विद्वानांनी उपलब्ध ग्रंथांचे संरक्षण करून ही समृद्ध ज्ञानपरंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली. या परंपरेचे जतन आणि संवर्धन करणे ही आजची मोठी जबाबदारी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १५ सप्टेंबर २०२६


# गणेशोत्सव : श्रद्धा, संस्कार आणि सामाजिक वास्तव

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. श्रीगणेशाला आपण बुद्धी, विद्या, विवेक आणि मंगलतेची देवता मानतो. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सामाजिक एकोपा, जनजागृती आणि समाजसंघटनेचे स्वरूप दिले. त्यामुळे गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरू शकतो.मात्र, काळ बदलला तसे उत्सवाचे स्वरूपही बदलले. भव्य सजावट, डीजे, मिरवणुका, रोषणाई, वर्गणी आणि मनोरंजन यांना वाढते महत्त्व मिळाले. या सगळ्यात एक मूलभूत प्रश्न मात्र मागे पडतो—गणेशोत्सवातून आपण समाज म्हणून काय साध्य करतो आहोत?गणपती येण्याच्या महिनाभर आधीच अनेक ठिकाणी वर्गणी गोळा करण्यास सुरुवात होते. काही दिवसांपूर्वी बाजारात गेलो असता पंधरा वर्षांखालील दहा-बारा मुले गणेशोत्सवाची वर्गणी जमा करताना दिसली. एका दुकानदाराला ‘एवढे पैसे द्या’, ‘तेवढे पैसे द्या’ असा आग्रह सुरू होता. दुकानदाराने पैसे दिल्यानंतर मी ग्राहक म्हणून तेथे बसलो होतो. मलाही त्या मुलांनी सहजपणे सांगितले, ‘सर, तुम्ही सुद्धा द्या.’क्षणभर प्रश्न पडला—वर्गणी ही स्वेच्छेची देणगी आहे की दिसेल त्या व्यक्तीवर केला जाणारा आग्रह?वर्गणी देणे ही श्रद्धेची बाब असावी; सामाजिक दबावाची नव्हे. आर्थिक परिस्थिती लक्षात न घेता दुकानदार, रहिवासी किंवा ग्राहकांकडे ठरावीक रकमेची मागणी करणे योग्य नाही. विशेषतः लहान मुलांना घेऊन अशी वर्गणी गोळा करण्याची पद्धत आपण पालक म्हणून गांभीर्याने तपासायला हवी. याहून गंभीर बाब म्हणजे हीच मुले नंतर एका खाद्यपदार्थाच्या स्टॉलवर एनर्जी ड्रिंक घेताना दिसली. मुद्दा त्या पेयाचा नाही; मुद्दा पैशांच्या वापरातून दिल्या जाणाऱ्या संस्कारांचा आहे. गणपतीच्या नावाने पैसे जमा करायचे आणि त्याच पैशांतून स्वतःची मौजमजा करायची असेल, तर आपण मुलांना नेमके काय शिकवत आहोत?आज वर्गणी मागण्याची सवय, उद्या सार्वजनिक पैशाबद्दलची बेफिकिरी—अशी सुरुवात नकळत सवयीमध्ये बदलू शकते. हीच मुले पुढे समाजाचे नेतृत्व करणार आहेत. त्यामुळे त्यांना केवळ उत्सवात सहभागी करून घेण्यापेक्षा प्रामाणिकपणा, पारदर्शकता, स्वेच्छा आणि सामाजिक जबाबदारी शिकवणे अधिक महत्त्वाचे आहे.कॉलनीतही पंधरा-वीस मुले एकत्र येऊन घराघरांत वर्गणी मागतात. ‘प्रत्येकाने द्यायलाच हवी’ असा अप्रत्यक्ष दबाव निर्माण होतो. अशा वेळी पालकांनी विचार करायला हवा. मी माझ्या मुलाला अशा पद्धतीने वर्गणी मागायला पाठवणार नाही, हा निर्णय चुकीचा ठरेल का? मुलांनी सामाजिक कार्यात सहभागी व्हावे, पण त्यांच्या हातात वर्गणीची यादी देऊन घराघरांत फिरवणे हाच सामाजिक सहभागाचा एकमेव मार्ग नाही.विशेषतः विद्यार्थ्यांचा हा अभ्यासाचा आणि स्वतःच्या भविष्याची तयारी करण्याचा काळ आहे. अनेक दिवस उत्सवाच्या तयारीत, वर्गणी गोळा करण्यात किंवा रात्री उशिरापर्यंत कार्यक्रमांत सहभागी होण्यात त्यांचा वेळ जातो. उत्सव काही दिवसांचा असतो; पण विद्यार्थ्यांचे भविष्य आयुष्यभराचे असते.दरवर्षी मोठ्या जल्लोषात गणेशोत्सव साजरा होतो. पैसा खर्च होतो, आवाज होतो, मिरवणुका निघतात, सोशल मीडियावर प्रदर्शन होते. पण या सगळ्याचा सामाजिक ‘आउटपुट’ काय, हा प्रश्न आपण विचारतो का?किती विद्यार्थ्यांना मदत झाली? किती गरजू कुटुंबांना आधार मिळाला? किती झाडे लावली? किती लोकांमध्ये व्यसनमुक्ती किंवा पर्यावरणाची जाणीव निर्माण झाली? किती युवकांना कौशल्य आणि रोजगाराचे मार्गदर्शन मिळाले?गणपतीला आपण विद्येची देवता म्हणतो. मग त्यांच्या उत्सवाच्या नावाखाली विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा वेळ वाया जाणे, अवाजवी वर्गणीचा आग्रह, ध्वनिप्रदूषण आणि अनावश्यक खर्च याकडे दुर्लक्ष करणे ही विसंगती नाही का? विद्येच्या देवतेची पूजा करताना आपल्या कृतीत विवेक दिसला पाहिजे.ध्वनिप्रदूषण हा त्यातील आणखी एक गंभीर प्रश्न आहे. मोठ्या आवाजातील डीजे आणि रात्री उशिरापर्यंत चालणारे कार्यक्रम यामुळे विद्यार्थी, वृद्ध, रुग्ण आणि परिसरातील नागरिकांना त्रास होतो. उत्सवाचा आनंद घेण्याचा अधिकार आहेच; पण इतरांच्या शांततेचाही तितकाच अधिकार आहे. भक्तीचा आवाज मोठा असण्यापेक्षा भक्तीचे आचरण मोठे असणे आवश्यक आहे.याच विवेकाची गरज विसर्जनाच्या बाबतीतही आहे. पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असताना जलस्रोतांचे संवर्धन करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे ‘गणपती पाण्यातच विसर्जित झाला पाहिजे’ हा आग्रह बदलत्या परिस्थितीनुसार सोडायला हवा. पर्यावरणपूरक मूर्ती, घरगुती विसर्जन किंवा कृत्रिम विसर्जन तलाव यांसारखे पर्याय स्वीकारता येतात. श्रद्धा टिकवण्यासाठी पाण्याचा अपव्यय करणे आवश्यक नाही.आज अनेक धार्मिक उत्सवांच्या निमित्ताने सामाजिक अशांतता, आवाज, गर्दी आणि परस्परांबद्दलची असंवेदनशीलता वाढताना दिसते. धर्म हा माणसाला जोडणारा, संवेदनशील आणि विवेकी बनवणारा असायला हवा. आपल्या देशासमोर बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, पाणी, महागाई, पर्यावरण आणि सामाजिक विषमता यांसारखे प्रश्न आहेत. आपल्या वैयक्तिक आयुष्यातही अनेक समस्या आहेत. त्यांचा विचार न करता केवळ धार्मिक भावनेच्या लाटेत वाहून जाणे समाजासाठी हिताचे नाही.एखादी गोष्ट धार्मिक आहे म्हणून तिच्यावर प्रश्न विचारू नयेत, अशी मानसिकता योग्य नाही. श्रद्धेला विवेकाची जोड मिळाली तरच ती समाजासाठी विधायक ठरते. म्हणून गणेशोत्सवाला विरोध करण्याची गरज नाही; त्याला योग्य दिशा देण्याची गरज आहे. मोठ्या सजावटीऐवजी सामाजिक उपक्रम, डीजेऐवजी प्रबोधन, दबावाच्या वर्गणीऐवजी स्वेच्छेचे योगदान, अनावश्यक खर्चाऐवजी गरजू विद्यार्थ्यांना मदत आणि जलप्रदूषणाऐवजी पर्यावरणपूरक विसर्जन—हा बदल आपण करू शकतो. उत्सवाची भव्यता मंडपाच्या आकाराने, डीजेच्या आवाजाने किंवा जमा झालेल्या वर्गणीने मोजण्याऐवजी त्याच्या सामाजिक परिणामाने मोजली पाहिजे. गणेशोत्सव संपल्यानंतर आपल्या परिसरात काय बदलले, एखाद्या गरजूच्या जीवनात काय फरक पडला, एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षणासाठी मदत झाली का, एखाद्या तरुणाला चांगली दिशा मिळाली का, पर्यावरणाचे आपण किती रक्षण केले—याची उत्तरे जर समाधानकारक असतील तरच उत्सवाचे खरे सार्थक झाले असे म्हणता येईल. गणपती बाप्पा आपल्याला बुद्धी आणि विवेक देतात, असे आपण म्हणतो. मग त्या बुद्धीचा आणि विवेकाचा उपयोग उत्सव साजरा करतानाही करू या. उत्सव मोठा असण्यापेक्षा विचार मोठा असावा; आवाज मोठा असण्यापेक्षा विवेकाचा आवाज मोठा असावा; वर्गणी मोठी असण्यापेक्षा सामाजिक योगदान मोठे असावे. हीच गणेशोत्सवाची खरी समृद्धी आणि समाजाप्रती खरी भक्ती ठरेल.


**प्रा. प्रियदर्शन भवरे**
**जालना**


# उरामध्ये आग

शेत शिवाराच्या ! उरामध्ये आग !
काळजात धग! कुणब्याच्या !!

तणांचा हैदोस! वाढला पिकात!!
खुरपे कोमात ! नेमकेच!

आता आभाळाचे! आटलेय डोळे!
रानवारे भोळे! थकलेले !!

करपले पीक! भेगाळले रान!
पावसाचे दान! कोरडेच!!

गाव पाखरांच्या! जगण्याचे वांधे!
बगळ्यांचे धंदे! वाढलेले!!

कष्टाच्या वहीत! गहाण नशिब !
घामाचे हिशोब! चुकलेले !!




**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**



१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १५ सप्टेंबर २०२६


## गणपती सजावट साहित्य खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी



**कन्नड (अरुण थोरात) :** गणेश चतुर्थी व गणपती सजावट साहित्य खरेदी साठी कन्नड येथील बाजार पेठेत ग्राहकांची झुंबड दिसून आली.कन्नड येथे सोमवारी आठवडी बाजार असल्याने ग्रामीण भागा सह शहरातील गणेश भक्तांनी गणपती सजावट साहित्य खरेदी साठी बाजारात गर्दी केली. यंदा गणपती मुर्ती व सजावट साहित्याच्या दरात मोठी वाढ झाली असली तरी त्याचा खरेदीवर फारसा परिणाम झालेला दिसत नाही. तालुक्यात 219 गणेश मंडळे आहेत. तसेच घरगुती गणपतींची स्थापना ही मोठ्या प्रमाणात केल्या जाते. गणपतींच्या आकर्षक मुर्ती, सजावट साहित्य, वेगवेगळ्या प्रकारचे देखावे साहित्य, विद्युत रोषणाई साहित्य, रंगीबेरंगी पताका, कापड, यासह मोदक, मिठाई साहित्य खरेदी साठीची दुकाने गजबजली आहेत. यातून लाखो रुपयांची लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. त्यामुळे व्यापार्यांकडून समाधान व्यक्त होत आहे.

## अस्मानी सुलतानी संकट

साऱ्या जगाचा पोशिंदा,
सदा रात्रंदिवस राबतो.
धान्य पिकवितांना शेतात,
नयनी तेल घालून जागतो. १

उन्हातान्हात राबतांना,
सदा सर्वदा घाम गाळतो.
जगताना जीवनात सारे,
नियम काटेकोर पाळतो. २

निसर्गाला देव मानून,
संसारात दुःख झेलतो.
अस्मानी सुलतानी संकट,
छाताडावर तोच पेलतो. ३

देवा तुझ्या दरबारात मी,
आता एक मागणी करतो.
बळीराजाचे राज्य येऊ दे,
सर्व विश्वाचे पोट तो भरतो. ४

पिकविलेल्या धान्याला
हमी भाव चांगले मिळावे.
बळीराजाच्या जीवनातले,
संकट कायम दूर पळावे. ५

जगाच्या पोशिंद्याचे सदैव,
काळजीपूर्वक रक्षण करावे.
बळीराजाच्या खळयामध्ये,
धान्य पोते भरभरून भरावे. ६




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


## मन्सूर भाई



गावाकडे जाणं म्हणजे फक्त आपल्या घरी जाणं नसतं. ते आपल्या मुळाशी जाणं असतं. शहरात आपण कितीही मोठे झालो, कितीही शिकलो, तरी गावात गेल्यावर आपल्याला आपली खरी ओळख करून देणारी काही माणसं भेटतात. ती माणसं काळाप्रमाणे बदलत नाहीत. ती जशी लहानपणी होती, तशीच आजही असतात. त्यांचा पोशाख तोच, त्यांच्या बोलण्याची ढब तीच आणि त्यांच्या मनातली माणुसकीही तीच. अशा माणसांपैकी एक म्हणजे आमच्या गावचे मन्सूर भाई. गावाकडे गेलो की त्यांना भेटल्याशिवाय परत यावंसं वाटतच नाही. त्यांची भेट झाली नाही तर गावाला जाऊन आल्याचं समाधानच मिळत नाही. असं वाटतं की काहीतरी राहून गेलं.आमच्या गावात मुस्लिम समाजाची अगदी दोन चार घरं आहेत. पण कधीच कुणाला ते वेगळे आहेत असं वाटलं नाही. याचं सगळं श्रेय मन्सूर भाई सारख्या माणसांकडे जातं. त्यांनी कधीच स्वतःला वेगळं मानलं नाही आणि गावानेही त्यांना कधी वेगळं मानलं नाही. गावात सप्ताह असो, यात्रा असो, भंडारा असो किंवा शाळेचा एखादा कार्यक्रम असो, वर्गणीच्या यादीत मन्सूर भाईंचं नाव हे असणारच. फक्त वर्गणी देऊन ते थांबत नाहीत. तर प्रत्यक्ष कामात ते सगळ्यात पुढे असतात. गावात कोणाचंही लग्न असो, कोणताही समारंभ असो, स्वयंपाकाच्या ठिकाणी सगळ्यात आधी हजर असणारा माणूस म्हणजे मन्सूर भाई. खांद्यावर टॉवेल, लुंगी वर खोचलेली आणि हातात मोठा पळी घेऊन ते सगळीकडे फिरत असतात. पाहुण्यांच्या पंगती उठल्या का, भाजीला मीठ बरोबर आहे का, भात शिजला का, याची ते स्वतःच्या घरच्या कामासारखी काळजी घेतात. हे त्यांना कुणी सांगावं लागत नाही. गावचं काम म्हणजे आपलंच काम, ही त्यांची साधी आणि सरळ भावना आहे. आणि म्हणूनच गावातल्या प्रत्येकाला त्यांच्याबद्दल आपुलकी वाटते.मन्सूर भाईंच्यातला सगळ्यात मोठा गुण म्हणजे त्यांची माणुसकी आणि धर्माच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची त्यांची वृत्ती. ते स्वतः पाच वेळा नमाज पडणारे, रोजा पाळणारे कट्टर मुसलमान आहेत. पण त्यांनी धर्माला कधी भिंतीत बंदिस्त केलं नाही. त्यांनी धर्मातली माणुसकी जपली. त्यांना कीर्तन ऐकायला मनापासून आवडतं. गावात कीर्तन असलं की ते पुढच्या रांगेत बसलेले दिसणारच. डोळे मिटून, टाळ वाजवत ते अभंग ऐकतात. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव यांचे अनेक अभंग त्यांना तोंडपाठ आहेत. एखाद्या कीर्तनकाराने अभंगाचा अर्थ चुकवला तर कीर्तन झाल्यावर ते त्याला बाजूला घेऊन अतिशय नम्रपणे त्याची चूक दाखवून देतात. जागरण, गोंधळ, भारूड असेल तरी ते तितक्याच आवडीने जातात. मी एकदा त्यांना सहज विचारलं होतं की भाई तुम्हाला यातलं काय कळतं. तेव्हा ते हसून म्हणाले होते, देव एकच आहे, त्याला हाक मारायची भाषा फक्त वेगळी आहे. आपण सगळे त्याच्याच लेकरांनी. आज जेव्हा टीव्हीवर धर्माच्या नावाने रोज भांडणं लावली जातात, तेव्हा मन्सूर भाईंकडे पाहिलं की खरा भारत अजूनही गावखेड्यातच जिवंत आहे याची खात्री पटते. ही शिकवण कुठल्या पुस्तकातून येत नाही, ती जगण्यातून येते.त्यांचा स्वभाव अतिशय परखड, निर्भीड आणि स्पष्ट आहे. मनात एक आणि ओठावर एक असं त्यांच्याकडे कधीच नसतं. जे वाटतं ते ते थेट तोंडावर बोलून टाकतात. यात समोरचा लहान आहे की मोठा, गरीब आहे की श्रीमंत, सामान्य कार्यकर्ता आहे की मोठा आमदार, याचा ते कधीच विचार करत नाहीत. गावात एखादा वाद झाला, दोन गटात भांडण झालं तर लोकं आपसूकच मन्सूर भाईंकडे येतात. कारण सगळ्यांना माहिती असतं की हा माणूस कुणाचीही बाजू घेणार नाही. जे खरं असेल, जे योग्य असेल तेच तो बोलणार. चुकणाऱ्याला तो समज देतो, प्रसंगी त्याला खडसावूनही सांगतो. त्यामुळे गावात त्यांच्याबद्दल एक आदर आहे, पण त्याचबरोबर एक दराराही आहे. त्यांना उपद्व्यापी, कुरापती माणसं अजिबात आवडत नाहीत. चांगल्या माणसाच्या पाठीमागे मात्र ते भिंतीसारखे उभे राहतात. राजकारणाची त्यांना प्रचंड आवड आहे. गावाच्या शिवारात, तालुक्यात कुठेही कोणत्याही पक्षाची सभा असो, मन्सूर भाई तिथे जाणारच. ते फक्त ऐकायला जात नाहीत, तर बोलायला जातात. आमदार असो वा खासदार, भर सभेत हात वर करून ते थेट प्रश्न विचारतात. आमच्या शिवाराच्या पाण्याचं काय झालं, आमच्या रस्त्याचं आश्वासन तुम्ही गेल्या वेळी दिलं होतं, त्याचं पुढे काय झालं, असे थेट प्रश्न ते विचारतात. अनेक पुढाऱ्यांना हे आवडत नाही, त्यांची तोंडं उतरतात, पण गावातल्या लोकांना माहिती असतं की हा माणूस स्वतःसाठी काही मागत नाहीये, हा गावासाठी बोलतोय. त्याच्या बोलण्यात स्वार्थ नाही, तर कळकळ आहे. प्रचारातही ते मनापासून भाग घेतात, पण त्यातही त्यांचा स्वाभिमान ते कधीच सोडत नाहीत.मन्सूर भाईंचं जगणं हे कष्टाचं जगणं आहे. शेती, मजुरी, मिळेल ते काम ते करतात. कधी हातावर पोट असतं, कधी उपाशी राहावं लागतं, पण त्यांनी कधी कुणापुढे हात पसरला नाही. लाचारी करून जगणं त्यांना मान्य नाही. त्यांचं एक वाक्य नेहमी लक्षात राहतं, ते म्हणतात पोटासाठी काम करावं लागतं, पण इज्जतीसाठी जगावं लागतं. हा स्वाभिमानी बाणा त्यांनी आजवर जपला आहे. कुणाकडून कसलीही अपेक्षा न ठेवता जगणं, हेच त्यांच्या व्यक्तिमत्वाचं मोठेपण आहे. त्यामुळे ते कुणाचे देणेकरी नाहीत आणि म्हणूनच ते कुणाला घाबरतही नाहीत. गावातल्या तरुण पिढीमध्ये मन्सूर भाई खूप लोकप्रिय आहेत. गावातल्या पोरांचे क्रिकेटचे सामने असले की ते स्वतःची सगळी कामं बाजूला ठेवून त्यांच्या मागे बाहेरगावी सुद्धा जातात. उन्हातान्हात बांधावर बसून ते सामना पाहतात. पोरांना टाळ्या देऊन प्रोत्साहन देतात. पण फक्त कौतुकच करतात असं नाही, तर चूक झाली तर त्याच मोकळेपणाने कान पकडून समजही देतात. अरे काल तू दारू पिऊन फिरत होता म्हणे, हे तुला शोभतं का, खेळाकडे लक्ष दे, असं ते थेट बोलतात. त्यामुळे पोरं त्यांना घाबरत नाहीत, तर त्यांचा आदर करतात. शाळेतल्या विद्यार्थ्यांना, तरुणांना ते नेहमी एकच सल्ला देतात, शिका, मोठे व्हा, साहेब व्हा, पण मोठे झाल्यावर गावाला विसरू नका. आपल्या शिवाराची माती कधीच विसरायची नसते. गावातली मुलं मोठी व्हावीत, त्यांनी चांगलं जीवन जगावं, अशी त्यांची मनापासूनची इच्छा असते. आणि या इच्छेत कुठलाही स्वार्थ नसतो.अशी माणसं आता शहरात शोधूनही सापडत नाहीत. शहराच्या गर्दीत ती हरवून जातात. पण गावात ती अजूनही ठळकपणे दिसतात. मन्सूर भाई हे कुठल्या मोठ्या पदावर नाहीत. त्यांची कधी पेपरात बातमी येत नाही. त्यांचा कधी सत्कार होत नाही. पण तरीही गावात काहीही घडलं, चांगलं असो वा वाईट, मन्सूर भाई तिथे असणारच, हे समीकरण ठरलेलं आहे. ते नसतील तर कार्यक्रमाला शोभाच येत नाही.थोडक्यात सांगायचं तर मन्सूर भाई हे गावगाड्याचा आत्मा आहेत. ते अस्सल मराठी बाणा जपणारे, माणुसकी जपणारे खरे माणूस आहेत. त्यांच्याकडून खूप काही शिकण्यासारखं आहे. धर्मापेक्षा माणुसकी मोठी असते, स्वाभिमानाने जगणं म्हणजे काय असतं आणि गावावर निस्वार्थ प्रेम करणं म्हणजे काय असतं, हे त्यांच्याकडून शिकावं. गावाकडून शहराकडे येताना माणसं खूप काही घेऊन येतात, पण मन्सूर भाईंसारखी माणसं मनात आठवणी दाटून आणतात. म्हणूनच येता जाता त्यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. गाव म्हणजे फक्त घरं, शेतं आणि रस्ते नसतात, गाव म्हणजे मन्सूर भाईंसारखी जिवंत माणसं असतात. ती असेपर्यंत गाव जिवंत असतं, गावपण टिकून असतं.


**डॉ. शिवाजी हुसे**
**कन्नड**
**मो. +91 94040 00398**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १५ सप्टेंबर २०२६

# ओबीसी सारख्या सवलती मराठा समाजास देतांना केजी ते पीजी सवलती द्या



**प्रतिनिधी (मुंबई)** : मराठा आरक्षणा संदर्भातील न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल पाहिला तर त्याच्या मुख्य शिफारशींचा गाभा पाहता ओबीसी सारख्या सवलती मराठा समाजास देतांना केजी ते पीजी सवलती द्या, वैद्यकीय- अभियांत्रिकी-व्यवसाईक - अव्यवसाईक अभ्यासक्रम व परदेशी शिक्षणात सवलती, वयो मर्यादा सवलत द्याव्यात आणि अराजकीय आरक्षण देऊन समाज मनातील आक्रोश दुर करा व सुधारीत शासनादेश काढा अशी महत्वाची समाज मन जोडणारी मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी शासना कडे करून शुक्रे आयोगाचे सविस्तर वाचन केल्याचे सिद्ध केले आहे. आयोगाच्या मुख्य शिफारशी आम्ही अभ्यासल्या या बाबत बोलतांना ते म्हणाले की,मराठासमाजाला स्वतंत्र सामाजिक-शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्ग म्हणून मान्यता द्यावी.मराठा समाजा साठी स्वतंत्र आरक्षणाची तरतूद करावी,इतर मागासवर्गीयांच्या विद्यमान आरक्षणाला धक्का न लावता.शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये स्वतंत्र आरक्षण द्यावे.असामान्य व अपवादात्मक परिस्थिती असल्याचे नमूद करून ५० % आरक्षणाची घटनात्मक मर्यादा ओलांडण्याचे समर्थन करावे.मराठा समाजातील शैक्षणिक मागासलेपणा, सरकारी सेवांमधीलअपुरे प्रतिनिधित्व आर्थिक अडचणी आणि सामाजिक मागासलेपणा यांचा विचार करावा. आरक्षणासाठी जात निहाय व सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणातील आकडेवारीचा आधार घ्यावा अशी महत्वाची नोंद हा अहवाल महाराष्ट्र सरकारने नियुक्त केलेल्या आयोगाचा असून, आयोगाने राज्यातील सुमारे १ कोटी५८ लाख कुटुंबांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास केला होता.मात्र, अहवालातील संपूर्ण शिफारशींचे अधिकृत व प्रमाणित स्वरूप सरकारने प्रसिद्ध केलेल्या अहवाल/शासन निर्णयातूनच तपासणे योग्य ठरणार असल्याचे महत्वाचे मत जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी मांडताना नमुद केले की, कायद्याच्या दृष्टीने,५० टक्के मर्यादा ओलांडण्याचे समर्थन करण्यासाठी विशेष परिस्थिती आणि परिमाणात्मक,अद्ययावत -विश्वासार्ह आकडेवारी आवश्यक ठरते; त्यामुळे आयोगाच्या शिफारशींची घटनात्मक वैधता न्यायालयीन परीक्षणाच्या अधीन राहते.न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षते खालील महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या मराठा समाजावरील सर्वेक्षणाची प्रमुख वैशिष्ट्ये तपासली तर लक्षात येईल की,सर्वेक्षणाची व्याप्ती पाहता सर्वेक्षण राज्यभर करण्यात आले.ग्रामीण तसेच शहरी भागातील मराठा आणि खुल्या प्रवर्गातील कुटुंबांचा समावेश करण्यात आला. सुमारे १ कोटी ५८ लाख कुटुंबांचे सर्वेक्षण झाल्याचे सांगण्यात आले; त्यातून सुमारे अडीच कोटी व्यक्तींची माहिती संकलित झाल्याचे राज्य सरकारने नमूद केले. हे सर्वेक्षण २३ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत पूर्ण करण्यात आले. सर्वेक्षणाची विषयवस्तू सर्वेक्षणात मराठा समाजाच्या अनेक बाबींचा अभ्यास करण्यात आला- सामाजिक स्थिती आणि सामाजिक मागासले पणा शैक्षणिक स्थिती व शिक्षणा तील सहभाग. सरकारी नोकरी आणि सार्वजनिक सेवांमधील प्रतिनिधित्व आर्थिक स्थिती,उत्पन्न आणि रोजगार ग्रामीण-शहरी जीवन मानातील फरककुटुंबांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती.आत्महत्या,शेती, कर्जबाजारीपणा व उप जीविकेशी संबंधित परिस्थिती आणि विशेष म्हणजे "सांख्यिकीय पद्धती" आयोगाने मोठ्या प्रमाणावर कुटुंबाधारित प्रत्यक्ष सर्वेक्षण केले.माहिती संकलनासाठी संरचित प्रश्नावलीचा वापर करण्यात आला असुन मराठा समाजाची स्थिती इतर समाजघटकांशी आणि खुल्या प्रवर्गाशी तुलना करण्याचा प्रयत्न करण्यात आला.आयोगाने आपल्या अभ्यासाला राज्यातील मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपणाचा तपशीलवार व सखोल अभ्यास असे स्वरूप दिले. विशेष वैशिष्ट्ये असे की,अत्यंत मोठ्या प्रमाणातील सर्वेक्षण - राज्यातील जवळपास सर्व मराठा कुटुंबां पर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला असुन ग्रामीण आणि शहरी दोन्ही क्षेत्रांचा समावेश- सर्वेक्षण केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित नव्हते तर बहुआयामी अभ्यास-फक्त आर्थिक निकषांऐवजी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि रोजगार विषयक निकषांचा एकत्रित विचार करण्यात आला.आरक्षणाच्या घटनात्मक परीक्षणा साठी आकडे वारीचा आधार-सरकारी नोकरी व शिक्षणातील प्रतिनिधित्व, मागासलेपण आणि विशेष परिस्थिती सिद्ध करण्यासाठी परिमाणात्मक माहिती संकलित करण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु पुढे बोलतांना जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी चर्चेतील आक्षेप देखील नमुद केला असुन या सर्वेक्षणाच्या कार्यपद्धतीवर काही आक्षेप ही घेण्यात आले. विशेषत सर्वेक्षणाचा कालावधी अत्यंत कमी होता, प्रश्नावली व नमुना-निवडीची पद्धत, आकडेवारीची स्वतंत्र पडताळणी आणि अहवालातील निष्कर्षांची विश्वासार्हता याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले.त्यामुळे सर्वेक्षणाची वैशिष्ट्ये सांगताना व्यापकता आणि जलद अंमलबजावणी ही दोन्ही परस्परविरोधी बाजू लक्षात घेणे आवश्यक आहे. आयोगाने व्यापक माहिती संकलित केल्याचा दावा केला, तर टीकाकारांनी अल्पकाला वधीत केलेल्या संकलना मुळे पद्धतशास्त्रीय त्रुटी राहू शकतात अशी चर्चा पुढे आली आहे.परंतु वास्तविकता अशी आहे की,न्या. सुनील शुक्रे आयोगाच्या सर्वेक्षणात खुल्या प्रवर्गाचा स्वतंत्र तुलना-गट म्हणून समावेश करण्यात आला होता. आयोगाने मुख्यत: मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गा तील कुटुंबांचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सर्वेक्षण केले इतर मागासवर्गीय-अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातींचे स्वतंत्र व्यापक सर्वेक्षण करण्यात आले नाही,अशी नोंद उपलब्ध वृत्तांतांत आहे.खुल्या प्रवर्गाचा समावेश कसा केला ?मराठा कुटुंबांप्रमाणेच खुल्या प्रवर्गातील कुटुंबां कडून माहिती घेण्यात आली.शहरी आणि ग्रामीण भागा तील कुटुंबांचा समावेश करण्यात आला. घराघरांत जाऊन प्रश्नावलीद्वारे माहिती संकलित करण्यात आली.प्रश्नावलीत सुमारे १५० ते १५४ प्रश्न होते या प्रश्नांमध्ये कुटुंबाचे उत्पन्न व आर्थिक स्थिती शिक्षण,रोजगार व सरकारी सेवांतील प्रतिनिधित्व महिलांची स्थिती आरोग्यसेवा व उपचारांची उपलब्धता पाणी व मूलभूत सुविधा बालमृत्यू,कुपोषण आणि सामाजिक परिस्थिती तुलना-गट म्हणून भूमिका खुल्या प्रवर्गातील कुटुंबांची माहिती मराठा समाजाच्या स्थितीशी तुलना करण्या साठी वापरण्यात आली. म्हणजेच मराठा समाज सामाजिक-शैक्षणिक दृष्ट्यामागास आहे का,हे ठरवताना खुल्या प्रवर्गातील सामाजिक शैक्षणिक, आर्थिक आणि रोजगार विषयक स्थितीशी तुलनात्मक विश्लेषण करण्यात आलेले असुन महत्त्वाचा कायदेशीर मुद्दा येथे “खुला प्रवर्ग” म्हणजे एकसंध जातसमूह नव्हे. खुल्या प्रवर्गातील जागा सर्व जातींसाठी खुल्या असतात; त्यामुळे त्यात विविध सामाजिक व आर्थिक स्तरांतील व्यक्ती असू शकतात.म्हणून खुल्या प्रवर्गाला एकसंध “अ-मागास” समूह मानून केलेली तुलना ही आयोगा च्या पद्धतशास्त्रातील महत्त्वाची बाब ठरते आणि तिच्या वैधतेवर काही आक्षेप ही घेण्यात आले असे नमुद करून जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की,न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या मराठा समाजा वरील सर्वेक्षणाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे सर्वेक्षणाची व्याप्ती सर्वेक्षण राज्यभर करण्यात आले. ग्रामीण तसेच शहरी भागातील मराठा आणि खुल्या प्रवर्गातील कुटुंबांचा समावेश करण्यात आला.सुमारे १ कोटी ५८ लाख कुटुंबांचे सर्वेक्षण झाल्याचे सांगण्यात आले; त्यातून सुमारे अडीच कोटी व्यक्तींची माहिती संकलित झाल्याचे राज्य सरकारने नमूद केले. हे सर्वेक्षण २३ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२४ या अल्प कालावधीत पूर्ण करण्यात आले. सर्वेक्षणाची विषयवस्तू सर्वेक्षणात मराठा समाजाचा विविध अंगाचा अभ्यास करण्यात आला-सामाजिक स्थिती व सामाजिक मागासलेपणा. शैक्षणिक स्थिती व शिक्षणातील सहभाग.सरकारी नोकरी आणि सार्वजनिक सेवां मधील प्रतिनिधित्वआर्थिक स्थिती, उत्पन्न आणि रोजगारग्रामीण-शहरी जीवन मानातील फरक.कुटुंबांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती आत्महत्या,शेती, कर्ज बाजारी पणा आणि उपजीविकेशी संबंधित परिस्थिती.सांख्यिकीय पद्धतीआयोगाने मोठ्या प्रमाणावर कुटुंबाधारित प्रत्यक्ष सर्वेक्षण केले.माहिती संकलनासाठी संरचित प्रश्नावलीचा वापर करण्यात आला.मराठा समाजाची स्थिती इतर समाजघटकांशी आणि खुल्या प्रवर्गाशी तुलना करण्याचा प्रयत्न करण्यात आला. आयोगाने आपल्या अभ्यासाला राज्यातील मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपणाचा तपशीलवार व सखोल अभ्यास असे स्वरूप दिले. विशेष वैशिष्ट्ये अत्यंत मोठ्या प्रमाणातील सर्वेक्षण -राज्यातील जवळपास सर्व मराठा कुटुंबांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला.ग्रामीण आणि शहरी दोन्ही क्षेत्रांचा समावेश-सर्वेक्षण केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित नव्हते तर बहु आयामी अभ्यास-फक्त आर्थिक निकषांऐवजी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि रोजगार विषयक निकषांचा एकत्रित विचार करण्यात आला.आरक्षणाच्या घटनात्मक परीक्षणासाठी आकडेवारीचा आधार- सरकारी नोकरी व शिक्षणातील प्रतिनिधित्व, मागासलेपण आणि विशेष परिस्थिती सिद्ध करण्या साठी परिमाणात्मक माहिती संकलित करण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे नमुद करतांना जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी या अहवालाचे सखोल निरीक्षण केले नसल्याचा दावा आपोआप खोटा व अयोग्य असल्याचे सिद्ध झाले असुन त्यांचे अन्नत्याग आंदोलन उपोषण म्हणूनच राज्य सरकारची डोकेदुखी ठरली असल्याची बाब संपूर्ण महाराष्ट्रात चर्चीली जात आहे हे विशेष होय.